श्रीहरिहरप्रतिष्ठानसंचलित

# गोविंदलालकन्हैयालालजोशी (रात्रीचे) वाणिज्य महाविद्यालय, लातूर

## मराठी भाषा संवर्धन पंधरवडा 2022

## भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवनिमित्त

## जागर कवितेचा अहवाल



"माणूसकीचे झरे आता आटू लागले

डोळ्यात अश्रू माझे दाटूलागले"

महाविद्यालयात भाषा विभागाच्या वतीने दरवर्षी विद्यापीठ परिपत्रकाप्रमाणे मराठी भाषा संवर्धन पंधरवडा मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. महाविद्यालय वाणिज्य शाखेचे असूनही भाषा विभाग हा अतिशय सुसंपन्न आहे. दरवर्षी भाषा विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन, नटराज उत्सव वार्षिक स्नेहसंमेलन व हिंदी दिवस या निमित्ताने सहित्यातील सखोल माहिती विद्यार्थ्यांना मिळावी या करीता निबंध, काव्यवाचन, वक्तृत्व, सुंदरहस्ताक्षर, शुध्दलेखन अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. तसेच साहित्यातील नामांकित लेखकांच्या भेटी आणि व्याख्यानाचेही आयोजन केले जाते. भाषा विभागाच्या वतीने या वर्षी दि. **14** जाने **28** जानेवारी **2022** मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त दि. **28-01-2022** रोजीजागर कवितेचा या **Online** कवी संमेलन पर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

दिनांक **28-01-2022** रोजी **14** जाने **28** जानेवारी **2022** मराठी भाषा संवर्धन पंधरवडाच्या निमित्ताने जागर कवितेचा या ऑनलाईन कवी संमेलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुजाता चव्हाण या होत्या. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून मराठवाड्यातील श्रेष्ठ चार कवी लाभले. उस्मानाबाद येथील प्रसिध्द कवी लेखक मा. माधव गरड, प्रसिध्द कवी गझलकार भागवत घेवारे, प्रसिध्द कवी पत्रकार मा. रसुल पठाण तर उदगीर येथील प्रसिध्द कवी पटकथा लेखक संपादक चित्रपट गीतकार रामदास केदार यांनी या कवीसंमेलनात आपल्या कविताचा जागर घडवून आणला.

या कवीनी आपल्या कवितेतून तरुणांना आवाहन केले. जागे व्हा आणि चिंतन करा. तसेच कृषी व्यवस्थेतील शेतकज्यांचा संघर्षही कवितेतून मांडला. सामाजिक जाणीव, प्रेम कविता, मनोरंजन पर कविता तसेच गंभीर विषयावरही कविता सादर केल्या. 'दगड नको बनू पोरा माणूस बनायला शिक' अशा तरुणांना अवाहन करणाज्या कविता हीसादर केल्या. या कार्यक्रमातील कवितांचा विद्यार्थ्यांनी मनसोक्त आनंद घेतला. तसेच उस्फूतपणे आपल्या स्वरचित कविता ही या कार्यकमात सादर केल्या.

या कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक तसेच कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. या कार्यकमांचे उल्लेखनीय यश म्हणजे यात इतर महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी व रसिक श्रोतावर्ग उपस्थित होता. या कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचालन भाषा विभागातील प्रा.नयन भादूले यांनी केले तर या कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाषा विभाग प्रमुख डॉ. विद्यादेवी कांबळे यांनी केले. सर्व उपस्थित रसिकश्रोता वर्गाचे आभार संस्कृत विषयाच्या प्रा. कल्पना झांबरे यांनी मानले.


7:00 PM
132KB/s
Nausin
ANITA
You
Ashish
ramdas
साहित्यनय
17 others


6:58 PM
117KB/s
Nausin
ANITA
You
Ashish
ramdas
साहित्यनय
17 others


6:58 PM
117KB/s
Nausin
ANITA
You
Ashish
ramdas
साहित्यनय
17 others


7:00 PM
132KB/s
Nausin
ANITA
You
Ashish
ramdas
साहित्यनय
17 others

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा २०२२ भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवा निमित्त जागर कवितेचा या Online कार्यक्रमाचा आनंद विद्यार्थ्यांनी घेतला. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या कवी संमेलनात स्वरचित कविता उर्स्फूतपणे सादर केल्या याचे कौतुक या कार्यक्रमास उपस्थित प्रमुख पाहुणे कवी यांनी केले. आणि विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाने या कार्यक्रमाचे आयोजन यशस्वीपणे केले हा ही उल्लेख प्रमुख कवीनीं नोंदवला आणि भाषा विभागास शुभेच्छा दिल्या.

भाषा विभाग प्रमुख
LECTURER
Govindlal Kanhaiyalal Joshi
(Night) Commerce College, Latur

प्राचार्य
I/c.Principal
Govindlal Kanhaiyalal Joshi
(Night)Commerce College, Latur